MHSN150013472023

( स्टेट बँक ऑफ इंडिया, पलूस विरुध्द महादेव संतु पांढरे-२ )

---

<u>विशेष दिवाणी दावा क्रमांक १४६/२०२३ मधील</u>
<u>निशाणी १२ खालील आदेश</u>

१. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ तर्फे दाखल अर्ज व वादीतर्फे दाखल म्हणणे वाचले. अभिलेख व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

२. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे अवलोकन करता असे स्पष्ट होते की, दिनांक १७/०८/२०२३ रोजी वादी याने प्रस्तुत प्रकरण दाखल केले आहे. तदनंतर, प्रस्तुत प्रकरणाचे समन्स व नोटीस प्रतिवादी यांना पाठविण्यात आले. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांना समन्स प्राप्त झालेनंतर, दिनांक २४/११/२०२३ रोजी तो प्रस्तुत प्रकरणकामी विधीज्ञ मार्फत (निशाणी १०) उपस्थित झाला असून, निशाणी ९ अन्वये कैफियत देणेकरीता मुदत अर्ज दाखल केला आहे. परंतु, प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी विहीत मुदतीत कैफियत दाखल केली नसल्यामुळे दिनांक ११/०१/२०२४ रोजी प्रतिवादी क्रमांक १ ते ३ विरुध्द 'विना कैफियत' सुनावणीबाबत आदेश पारीत करण्यात आला आहे. तदनंतर, दिनांक ३०/०३/२०२४ रोजी प्रस्तुत प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला असून, अर्जासोबत कैफियत सादर केलेली आहे.

३. वादी याने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध नोंदवलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी कैफियत दाखल करणेकरीता जाणुनबुजून विलंब केला आहे. सबब, वादी याने प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणाचे अभिलेखाचे अवलोकन व उपरोक्त विवेचनांचा विचार करता, प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. अद्याप प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीतर्फे पुरावा नोंदविण्यात आलेला नाही अथवा प्रस्तुत प्रकरणामध्ये अद्याप प्रभावी/परिणामकारक सुनावणी प्रक्रियेस प्रारंभ झाला नाही. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांना प्रस्तुत प्रकरणाकामी बचाव उपस्थित करणेचे संधी उपलब्ध करुन देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे वादी याचे कोणतेही नुकसान संभवत नाही. तसेच, प्रस्तुत प्रकरणाची गुणदोषावर सुनावणी होऊन निर्णय होणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी कैफियत सादर केलेली आहे. प्रस्तुत प्रतिवादी तर्फे सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला आहे. सदर विलंबापोटी प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचेकडून खर्च आकारण्यात येऊन सदर खर्चाची रक्कम वादी यास देणे उचित होईल. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज र.रु.३००/- (तीनशे रुपये मात्र) खर्च आकारण्यात येऊन मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांचे विरुध्द दिनांक ११/०१/२०२४ रोजी “विना कैफियत” सुनावणीबाबत झालेला आदेश रद्द करण्यात येत असून, कैफियत दाखल करणेसाठी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे व प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांची कैफियत अभिलेखावर दाखल करण्यात येते.

३. प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी पुढील तारीख अथवा तत्पूर्वी वादी यास खर्चाची रक्कम अदा करावी.

DNYANESHWAR SITARAM PATALE

Digitally signed by DNYANESHWAR SITARAM PATALE
Date: 2024.09.21 17:45:04 +0530

विटा. **(ज्ञानेश्वर सि. पताळे)**

दिनांकः २१/०९/२०२४. सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, विटा.

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. P. Pethkar. |
| Court | : | Jt. Civil Judge Senior Division, Vita. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 21/09/2024. |
| Judgment/Order uploaded on | : | 23/09/2024. |